नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
NASHIKMETROPOLIS Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१.

# भोगवटा प्रमाणपत्र
# OCCUPANCY CERTIFICATE

जा.क्र:नामप्रविप्रा/भोगवटा/मौ.ओझर,ता.निफाड/ग.नं.२६५६/२/भू.क्र.५६+५७+६०+६१/ ११७५
दि. 23/१० /२०२०

प्रति,

मे. सिध्दीविनायक बिल्डकॉन तर्फे भागीदार
श्री. शामकांत दादासाहेब जगताप व इतर,
रा. ओझर, ता.निफाड, जि.नाशिक
व्दारा - आर्कि. संजय कोल्हे

मौजे ओझर, ता.निफाड, जि.नाशिक येथील ग.नं.२६५६/२ मधील भू.क्र. ५६+५७+६०+६१ क्षेत्र ८१४.०० चौ.मी. क्षेत्रात **रहिवास** प्रयोजनार्थ इमारतीचे बांधकाम नकाशांना या प्राधिकरणाने पत्र क्र. नामप्रविप्रा/बां.प./मौ.ओझर,ता.निफाड/ग.नं.२६५६/२/भू.क्र.५६+५७+६०+६१/९२८,दि.२९/८/२०१८अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे. यावेळी आपण खालील प्रमाणे रक्कमा जमा केलेल्या आहेत.

| अ.क्र. | चलनाचा प्रकार | चलन क्र. व दि. | रक्कम | भरल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | छाननी शुल्क | ७६४/१२.३.२०१८ | ६,८६०/- | १४/३/२०१८ |
| २ | प्रिमिअम आकारणी | २३५९/२७.७.२०१ | ७,२३,८४०/- | ३१/७/२०१८ |
| ३ | विकास शुल्क | २३६०/२७.७.२०१८ | १,१२,८९०/- | ३१/७/२०१८ |
| ४ | सुरक्षा ठेव रक्कम | ३०९/२७.७.२०१८ | १९,५३०/- | ३१/७/२०१८ |
| ५ | कामगार कल्याण उपकर | ४१३/२७.७.२०१८ | १,७१,८२०/- | ३१/७/२०१८ |

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. संजय कोल्हे परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत या प्राधिकरणास दि. ३०/६/२०२० रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना खाली नमूद केलेल्या तपशिल व अटींस अधीन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे.

भोगवटा प्राप्त इमारतीचा तपशिल

| पहिला मजला | दुसरा मजला | तिसरा मजला | चौथा मजला |
|---|---|---|---|
| ३२१.१४५ चौ. मी. | ३२१.१४५ चौ. मी | ३२१.१४५चौ. मी. | ३२१.१४५ चौ. मी. |

**अटी व शर्ती:-**

१) अर्जदार यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस, सामासिक अंतरे इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार यांना नकाशात दर्शविलेली लगतचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) बांधकाम मंजुरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

५) प्रस्तुत प्रकल्पाकरिता सक्षम प्राधिकरणाने / ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पूर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

६) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, प्रिमियम शुल्क, विकास शूल्क इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उदभवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

७) भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या .बांधकामामध्ये प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय काही बदल केल्यास व यामुळे काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार / जागा मालक जबाबदार राहतील.

८) सदयस्थितीत कोव्हिड-१९ या साथीच्या रोगामुळे स्थळ निरीक्षण केलेले नसल्याने सदरील प्रंमाणपत्र हे आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्रमाणत्राच्या आधारे देण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर बांधकामामध्ये मंजूर नकाशापेक्षा बदल आढळुन आल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार व संबंधित आर्किटेक्ट / लायसन्स इंजिनीअर जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

Vaijapurkar

**(सुलेखा वैजापूरकर)**
**महानगर नियोजनकार,**
**नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**नाशिक**

**प्रतः- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**
ग्रामसेवक, ओझर ग्रामपंचायत, ता. निफाड, जि.नाशिक यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.